## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र .८१५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/१२/२०१७

**१) नगदी पैसे व चांदीच्या दागिन्याची चोरी :—**

दिनांक १३/१२/२०१७ चे २२.०० ते दि. १४/१२/१७ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी व त्याचे घरा शेजारील ज्ञानेश्वर धुर्वे यांचे घरी कुनीही नसल्याची संधी साधुन दरवाज्याची कडी कोंडा तोडुन, आत प्रवेश करून फिर्यादीचे घरचे ठोक चिल्लर मिळुन ७,०००/रु. व ज्ञानेश्वर धुर्वे यांचे घराचे नगदी ६,०००/रु. दोन जोडी चांदीच्या तोरडया कि. ३,०००/रु. असा एकुन १६,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी डॉ. सुभाष योगेश्वर भजीपाले वय ३८ वर्ष रा. असागाव यांचे तक्रारी वरून वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) काळी पीवळी वाहनाच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक १४/१२/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी सचीन दयाराम चाचेरे वय २२ वर्ष रा. खैरी पालांदुर हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच. ३६/ए ७४८० वर सत्यपाल चाचेरे यांचे सोबत साकोली वरून सानगडी मार्गे पालांदुर जात असता, सानगडी कडुन साकोली कडे येणारी चारचाकी काळी पीवळी चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे मोटार साकलला धडक मारून जखमी करून अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १३४/१८७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) ॲम्बुलन्स च्या धडकेत मोटार सायकल स्वार गंभिर जखमी :—**

दिनांक १४/१२/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा भाऊ जखमी विपीन शामराव नंदुरकर वय ५५ वर्ष रा. शास्त्री नगर भंडारा हा त्याचे ॲक्टीव्हा स्कुटी गाडी क्र. एमएच ३६ व्ही ४८०६ ने बेला कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ॲम्बुंलन्स गाडी हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटार सायकल ला धडक मारून गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

**४)खात्यातुन पैसे काढुन ऑनलाईन शॉपींग करून फसवणुक केल्याने गुन्हा नोंद**

दिनांक ०९/१२/२०१७ चे ११.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे मोबाईल क्र. वर आरोपीने आपले मोबाईल क्र. वरून फोन करून मी एस.बी.आय शाखा बांद्रा मुंबई येथुन मॅनेजर बोलत आहे असे सांगुन फिर्यादीस तुमच्या ए.टी.एम ची वैधता संपलेली आहे तुम्ही ए.टी.एम चा नंबर व ओटीपी नंबर सांगा असे सांगीतले वरून फिर्यादीने ए.टी.एम व ओटीपी नंबर दिल्याने, आरोपीने फिर्यादीचे खात्यातील २६,९६४/रु. ची अफरातफर करून ऑनलाईन शॉपींग करून फसवणुक केल्याने फिर्यादी अरून माणीक तांडेकर वय ५० वर्ष रा. सावरी यांचे तोंडी रपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४१९,४२०,४१७ भादवी. सहकलम ६६(अ)(ब) मा.त. अधी. २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास सपोनी नेवारे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत

५) <u>ट्रॉली बॅगमधुन सोन्याचा हार चोरून नेल्याने गुन्हा नोंद :–</u>

दिनांक १२/१२/२०१७ चे १६.४५ ते १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. वर्ष कुलदीप शुक्ला वय ३५ वर्ष रा. डॉ. झाकरी हुसेन वार्ड तिरोडा जि. गोंदीया ही भंडारा बसस्थानका वरून बस मध्ये बसुन गावी तिरोडा येथे जात असता, तिचे ट्राली बॅग मधुन यातील २५ ते ३० वयोगटातील अज्ञात आरोपी ईसमांनी ट्राली बॅग मध्ये असलेला अंदाजे दोन तोळयाचा सोन्याचा हार किमती ५६,०००/रु. चा माल चोरून नेल्याने, फिर्यादी यांचे लेखी रपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

६) <u>डोक्याला मार लागुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–</u>

दिनांक २२/११/२०१७ चे ०१.४५ वाजता दाम्यान यातील मृतक नंदलाल साबा रोहनकर वय ३८ वर्ष रा. पेंढरी याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल चालवीत असतांनी मोटार सायकल वरून पडुन डोक्याला मार लागल्याने मौजा पिलांद्री हद्दीतुन सरकारी दवाखाना नापुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. २८/११/२०१७ चे ०९.०० वाजता सदर मृतक हा मरण पावल्याने पोस्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. ची मर्ग डायरी प्राप्त झाल्याने सरतर्फे पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे नंबरी मर्ग नोंद करण्यात आले.

७) <u>आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–</u>

दिनांक १४/१२/२०१७ चे १७.४५ ते १८.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही आंबाडी येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. ~~अडयाळ~~ कारधा हे करीत आहेत.

८) <u>अवैध दारू/ जुगार अड्डयांवर धाडी . :–</u>

दिनांक १४/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, आंधळगाव, व लाखांदुर येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारू किंमती २३,००/–रु. व ०१ लिटर ८० मिलीलीटर देशी दारू कि. २३,००/रु तसेच जुगार असा एकुन ६३५ /रु असा एकुन ३,२४७/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १४/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी – ०२, तीन सिटर वाहनांवरती– ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ५६ केसेस करण्यात आलेले आहे.

15.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय
सत्यमेव जयते
भंडारा (म. रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.